ePaper

# जपानचे माजी पंतप्रधान शिंजो आबे यांचा गोळीबारात मृत्यू

| वर्ष - 6 | अंक - 93 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



## आतील पानांत


- संजय गांधी निराधार योजनेच्या जाचक अटी रद्द करा !
- जोर वाढला, पवना धरण क्षेत्रात संततधार !
- पुढच्या 5 वर्षांत देशातील पेट्रोल हद्दपार होईल


www.mahaenews.com | शुक्रवार | दिनांक 8 जुलै 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



"भारतीय जनता पक्षाच्या फडणवीस सरकारात असताना आजच्या मुख्यमंत्र्यांनी 'शिवसैनिकांवर अत्याचार होत आहेत, शिवसेनेच्या मंत्र्यांना मान-सन्मान मिळत नाही. निधीवाटपात वाटा नाही,' असा जाहीर त्रागा करून मंत्रीपदाचा राजीनामाच दिला होता. तेव्हा भाजपाला जी दूषणे दिली तीच आता इतरांना दिली जात आहेत. मुळात महाविकास आघाडीचे सरकार स्थापन झाले ते महाराष्ट्र व जनतेच्या कल्याणावर आधारित किमान समान कार्यक्रमाच्या अंमलबजावणीवर.

- उद्धव ठाकरे, शिवसेना

मातोश्रीचे दरवाजे सन्मानाने उघडले तर आम्ही आनंदाने परत येऊ, आता दरवाजे सन्मानाने उघडायचे म्हणजे नक्की कसे काय करायचे? मातोश्रीची परंपरा आणि संस्कार असा आहे की तिथे सगळ्यांचाच सन्मान होतो. दरवाजे उघडेच असतात व दाराबाहेरील चपलांचे ढिगारे हेच मातोश्रीचे वैभव आणि श्रीमंती आहे. मातोश्री तुमचे हक्काचे घर आहे. परत फिरा. घरी या यापेक्षा सन्मानाने बोलवण्याचा दुसरा कोणता मार्ग आहे काय?

- संजय राऊत, शिवसेना



## शॉर्ट न्यूज

### पिंपरी-चिंचवडला तूर्त पाणीकपातीची गरज नाही

**पिंपरी ।** पवना धरण क्षेत्रात तीन दिवसांच्या संततधार पावसामुळे पिंपरी-चिंचवड शहराला दोन आठवडे पुरेल इतका पाणीसाठा नव्याने जमा झाला आहे. त्यामुळे तूर्त शहराला पाणीकपात करावी लागणार नाही, असे पालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने स्पष्ट केले आहे. पिंपरी-चिंचवड शहरात गेल्या अडीच वर्षांपासून 'दिवसाआड एकवेळ', अशी पाणीकपात सुरू आहे. त्यात आणखी पाणीकपात करावी लागेल, अशी परिस्थिती निर्माण झाली होती. पाणीसाठा खूपच कमी झाल्याचे सांगत यापुढे काटकसरीने पाणीवापर करा आणि आणखी मोठी पाणीकपात करा, अशी स्पष्ट सूचना पाटबंधारे विभागाने पत्राद्वारे पिंपरी महापालिकेला केली होती. या पार्श्वभूमीवर, आणखी पाणीकपात करावी लागेल, अशी चिन्हे होती. तथापि, गेल्या तीन दिवसांत पवना धरण क्षेत्रात सतत पाऊस सुरू आहे.

### अजय चारठाणकर यांच्याकडे आरोग्य, तर सचिन ढोले यांच्याकडे आकाशचिन्ह व परवाना विभागाची जबाबदारी

# महापालिकेत 'खांदेपालट'!

## प्रशासक-महापालिका आयुक्त राजेश पाटील यांचा निर्णय

**| पिंपरी-चिंचवड | महाईन्यूज |**

पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आयुक्त राजेश पाटील यांनी उपायुक्त, सहाय्यक आयुक्तांच्या कामकाजाचे फेरवाटप केले. उपायुक्त अजय चारठाणकर यांच्याकडे आरोग्य, तर सचिन ढोले यांच्याकडे आकाशचिन्ह व परवाना विभागाची जबाबदारी दिली आहे.



महापालिका प्रशासकीय कामकाजाच्या सोयीच्या दृष्टीने कामकाजाचे फेरवाटप केले आहे. सहाय्यक आयुक्तांकडील विभाग कमी करुन उपायुक्तांकडे दिले आहेत. कार्यकारी अभियंता शिरीष पोरेड्डी यांच्याकडील दक्षता व गुणनियंत्रण विभाग काढला आहे. अतिक्रमण निर्मूलन, पशुवैद्यकीय विभागाचे उपायुक्त सचिन ढोले यांच्याकडे आकाशचिन्ह व परवाना विभागाची अधिकची जबाबदारी सोपविली आहे. समाज विकास विभाग, महिला बालकल्याण, दिव्यांग योजना विभागाचे उपायुक्त अजय चारठाणकर यांच्याकडे आरोग्य विभाग दिला आहे. माहिती व तंत्रज्ञान, नागरी सुविधा केंद्र, दक्षता व गुणनियंत्रण विभागाचे उपायुक्त विठ्ठल जोशी यांच्याकडे दक्षताच्या तांत्रिक बाबींसह क्रीडा विभाग सोपविला आहे. सहाय्यक आयुक्त रविकिरण घोडके यांच्याकडे माहिती व जनसंपर्क विभाग कायम ठेवत समाज विकास विभागाची नव्याने जबाबदारी सोपविली आहे.

### डॉ. अनिल रॉय 31 ऑगस्टला निवृत्त होणार...

सहाय्यक आयुक्त अण्णा बोदडे यांच्याकडील झोपडपट्टी निर्मुलन पुनर्वसन विभाग सहाय्यक आयुक्त सुषमा शिंदे यांच्याकडे सोपविला आहे. कर संकलन विभागाचे सहाय्यक आयुक्त निलेश देशमुख यांच्याकडील आकाशचिन्ह व परवाना विभाग काढला आहे. महापालिकेचे मुख्य आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. के.अनिल रॉय 31 जुलै रोजी सेवानिवृत्त होणार आहेत. त्यामुळे उपायुक्त चारठाणकर यांनी 1 ऑगस्ट 2022 पासून आरोग्य विभागाचा पदभार स्वीकारावा असे आयुक्तांनी आदेशात स्पष्ट केले आहे.

### राष्ट्रवादीच्या नव्या कार्यकारिणीला कामाला लागण्याच्या सूचना

# अजित गव्हाणे म्हणतात...महापालिका निवडणुकीत विजय आपलाच!

## पिंपरी-चिंचवड राष्ट्रवादी काँग्रेस कार्यकारणीची बैठक

**| पिंपरी-चिंचवड | महाईन्यूज |**


गेल्या पाच वर्षांत पिंपरी-चिंचवड महापालिकेत भाजपच्या सत्ताधाऱ्यांनी केलेल्या भ्रष्ट कारभारामुळे शहरातील जनताच भाजपाला सत्तेतून हद्दपार करणार आहे. राज्यातील सत्ता बदलचा महापालिका निवडणुकीवर कोणताच परिणाम होणार नसून, विजय आपलाच आहे. 'शंभर प्लस' हे आपले मिशन असून, ते साध्य करण्यासाठी आतापासूनच कामाला लागा, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी केले आहे. पिंपरी-चिंचवड शहर (जिल्हा) राष्ट्रवादी काँग्रेसच्या नवनियुक्त कार्यकारणी, विधानसभा कार्यकारी, सर्व सेलची कार्यकारणी तसेच प्रभाग अध्यक्ष, आजी-माजी नगरसेवक, पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या उपस्थिती पहिली मासिक सभा पार पडली. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना अजित गव्हाणे बोलत होते. या सभेस महिला अध्यक्षा कविता आल्हाट, युवक अध्यक्ष इम्रानभाई शेख, युवती अध्यक्षा वर्षा जगताप, माजी नगरसेवक भाऊसाहेब भोईर, माजी विरोधी पक्षनेते नाना काटे, कार्याध्यक्ष राहूल भोसले, प्रशांत शितोळे, विधानसभा अध्यक्ष शाम लांडे, पंकज भालेकर, विनोद नढे, संघटन सचिव अरुण बोऱ्हाडे, नारायण बहिरवडे, सतीश दरेकर, प्रकाश सोमवंशी, माजी नगरसेवक मयूर कलाटे, विक्रांत लांडे, मोरेश्वर भोंडवे,संगीता ताम्हाणे, पौर्णिमा सोनवणे माजी उपमहापौर महंम्मद भाई पानसरे, कार्याध्यक्ष फजल शेख यांच्यासह मोठ्या संख्येने



पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. पुढे बोलताना गव्हाणे म्हणाले, पिंपरी-चिंचवड महापालिकेत गेल्या पाच वर्षांत भाजपच्या सत्ताधाऱ्यांनी लाचखोरी, खंडणीखोरी आणि भ्रष्टाचार केल्याने शहराचा विकास खुंटला आहे.

## शॉर्ट न्यूज »

### पालकांची आर्थिक लूट करणाऱ्या शाळांवर कारवाईची मागणी



। पिंपरी। महाईन्यूज ।

विद्यार्थ्यांना वेठीस धरणाऱ्या तसेच मानसिक त्रास देऊन पालकांची आर्थिक लूट करणाऱ्या शाळांवर तत्काळ कारवाई करण्यात यावी, अशी मागणी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने महापालिकेकडे करण्यात आली आहे. पिंपरी चिंचवड शहरात अनुदानित शाळांची संख्या मोठी आहे. सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत विद्यार्थ्यांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार आहे. अनेक अनुदानित शाळांमध्ये कायद्याची पायमल्ली होत आहे. शुल्क भरले नाही म्हणून विद्यार्थ्यांचे शाळा सोडलेले दाखले, गुणपत्रिका अडवून ठेवण्यात येत आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान करणाऱ्या शाळांची चौकशी करावी. आर्थिक लूट करणाऱ्या शाळांवर कायदेशीर कारवाई करावी, अशा शाळांची मान्यता रद्द करण्यात यावी, अशी मागणी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे व प्रदेश महासचिव संतोष शिंदे यांनी शिक्षण विभागाकडे केली आहे.

### अंध, अपंग, विधवा, निराधार तसेच वयोवृद्ध नागरिकांची भर पावसात निदर्शने

# संजय गांधी निराधार योजना: जाचक अटी रद्द करा !

## शहर जिल्हा काँग्रेसच्यावतीने निदर्शने!



। पुणे। महाईन्यूज ।

काँग्रेसच्या वतीने या निदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. शहर जिल्ह्यात संजय गांधी निराधार योजना तसेच श्रावणबाळ योजनेअंतर्गत शेकडो लाभार्थी लाभ घेत आहे, परंतु अलीकडच्या काही महिन्यात लाभार्थ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. यापूर्वी कधीही सक्ती न केलेला दरवर्षी २१ हजार रूपये उत्पन्न दाखल्याची जाचक अट रद्द करावी, लाभार्थ्यांना दरमहा वेळेत पेन्शन मिळावी त्याचप्रमाणे मागील ३ ते ४ महिने या पेन्शनपासून लाभार्थी वंचित राहिले आहेत. अनेक बँका लाभार्थ्यांना पूर्ण पेन्शन काढून देत नाहीत. काही बँकांनी उत्पन्नाच्या दाखल्याची भीती दाखवून पेन्शन बंद केली आहे. लाभार्थी होण्यापूर्वी एखाद्याचा मृत्यू परराज्यात झाला असल्यास त्या कार्यालयाची ना हरकत प्रमाणपत्राची अट रद्द करावी, १५ वर्ष रहिवास दाखल्याची अट रद्द करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

काँग्रेसचे उपाध्यक्ष अजित दरेकर, सचिन आडेकर, राजेंद्र शिरसाट, मेहबुब नदाफ, लता राजगुरू, रजनी त्रिभुवन, राहुल तायडे, मारूती माने, अनसुया गायकवाड, ज्योती परदेशी, देवदास लोणकर, विल्सन चंदेलवेल यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.



### ...अरे काय तो सिलिंडर, काय ती महागाई"

# गॅस दरवाढीच्या निषेधार्थ राष्ट्रवादी काँग्रेसचं आंदोलन

पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

शिवसेना आमदारांनी एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात बंड करत, अगोदर सुरत आणि नंतर गुवाहाटी गाठलं होतं. त्या दरम्यान सांगोलाचे आमदार शहाजीबापू पाटील यांनी आपल्या एका कार्यकर्त्याला फोन केला व त्यावेळी त्यांनी म्हटलेला "काय तो डोंगार, काय ती झाडी, काय ते हॉटेल..." हा संवाद सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला.

असाच काहीसा डायलॉग म्हणून आज राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला कार्यकर्त्यांनी महागाईवरून सरकारवर टीका केली.

"अरे काय तो सिलिंडर, काय ती महागाई, काय ते सरकार, सगळचं नॉट ओके.." असं म्हणत आंदोलक महिला कार्यकर्त्यांनी महागाईवरून सरकारवर निशाणा साधला. पुण्यात कायम पाऊस सुरू आहे, अशावेळी भर पावसात या महिला कार्यकर्त्यांनी आंदोलन केले. या आंदोलनात राष्ट्रवादी काँग्रेस महिला आघाडीच्या अध्यक्षा मृणालिनी वाणी, वैशाली नागवडे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्या उपस्थिती होत्या. पर्यटन स्थळांवरही या निर्णयाची काटेकोर अंमलबजावणी करण्यात येणार आहे.'

"केंद्र सरकारमार्फत मागील सात वर्षांपासून सतत दरवाढ केली जात आहे. यामुळे सर्वासामान्यांचे जगणे कठीण झाले आहे. परंतु या सरकारला काही देणेघेणे नाही, त्यांना केवळ उद्योगपतींचीच काळजी आहे. त्यांना सबसिडी दिली जाते, मात्र सर्वसामान्यांना कोणतीही सबसिडी दिली जात नाही.

# महाविकास आघाडी सरकारला सुरूंग लावण्यात भाजप नेत्यांना यश

## हिंमत असेल तर... मनसेच्या वसंत मोरेंचं शिंदे-फडणवीस सरकारला चॅलेंज"

पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।



राज्यात अडीच वर्षानंतर महाविकास आघाडी सरकारला सुरूंग लावण्यात भाजप नेत्यांना यश आले असून शिवसेनेतील बंडखोरी यशस्वी ठरली आहे. शिवसेनेतील बंडखोर नेते एकनाथ शिंदे यांच्यासह 40 आमदार आणि 10 अपक्ष आमदारांनी भाजपसोबत युती केली. त्यानंतर, एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्रीपदाची तर देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. त्यानंतर, पहिलाच निर्णय आरे कारशेडसंदर्भात घेण्यात आला. त्यामुळे, आता ठाकरे सरकारचे निर्णय मोडीत निघणार का, अशी चर्चा होत असतानाच थेट जनतेतून नगराध्यक्ष निवडीची चर्चा रंगली आहे. यासंदर्भात मनसेच्या नगरसेवकानेही ट्विट केलं आहे.

देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री असताना राज्यात नगरपालिका, नगरपंचायत व ग्रामपंचायतमधील नगराध्यक्ष, सरपंच थेट जनतेतून निवडून यावा, याबाबत निर्णय घेतला होता. पण महाविकास आघाडी सरकारने हा निर्णय बदलून नगरपालिका, ग्रामपंचायतीमध्ये अस्थिर वातावरण तयार केले. येत्या विधिमंडळ अधिवेशनात महाविकास आघाडीचा निर्णय तातडीने बदलून सरपंच व नगराध्यक्ष थेट जनतेतून निवडण्याचा निर्णय घ्यावा, अशी मागणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केल्याचे माजी ऊर्जामंत्री आमदार चंद्रशेखर बावनकुळे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. त्यामुळे, जनतेतून नगराध्यक्ष आणि सरपंच निवडीची चर्चा रंगली आहे. त्यासंदर्भातच, मनसेचे पुण्यातील नेते वसंत मोरे यांनी ट्विट करत नव्या सरकारला आव्हान दिलं आहे.

सरकार बदलले, आता असे ऐकतोय प्रभाग रचनाही बदलणार आहात आणि म्हणे सरपंच आणि नगराध्यक्ष नागरिकांमधून निवडून देणार. माझे सरकारला एक आव्हान आहे, हिम्मत असेल तर मग महापौर सुद्धा जनतेतून निवडा, असे चॅलेंज वसंत मोरे यांनी शिंदे-फडणवीस सरकारला दिले आहे. तसेच, आजच सांगतो, किती पण ताकद लावा पुण्याचा महापौर मनसेचाच असेल.. असा विश्वाही वसंत मोरे यांनी व्यक्त केला आहे. बावनकुळेंना विश्वासदरम्यान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पुन्हा नगराध्यक्ष व सरपंच थेट जनतेतून निवडून आणण्यासंबंधी कायदा करून दिलासा देतील, असा विश्वास आमदार बावनकुळे यांनी व्यक्त केला. हा निर्णय सर्वच नगराध्यक्ष, सरपंचांना मान्य होईल, हा निर्णय नगरपालिका, ग्रामपंचायतमध्ये स्थिरता आणण्यासाठी महत्वाचा आहे, असेही ते म्हणाले ",

## शॉर्ट न्यूज

### इंटरनेटचा गैरवापर करून महिलेची १० लाखांची फसवणूक




पिंपरी चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी ।

वीज कंपनीची देयके भरायची आहेत, असे सांगून मोबाईल अद्ययावत करायला लावून इंटरनेटचा गैरवापर करून एका महिलेची १० लाखांची फसवणूक करण्यात आली आहे. याप्रकरणी सांगवी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. सांगवीतील ५३ वर्षीय महिलेने याप्रकरणी पोलिसांकडे तक्रार नोंदवली आहे.अज्ञात व्यक्तीने मोबाईलवरून या महिलेशी संपर्क साधला. वीज कंपनीची देयके भरायची आहेत. त्यासाठी मोबाईल अद्ययावत करायचा आहे. त्याकरिता क्विक सपोर्ट ॲप आणि एनी डेस्क ॲप डाऊनलोड करण्यास सांगितले. महिलेने तसे केल्यानंतर आरोपीने तिचा मोबाईल स्क्रीन शेअर करून इंटरनेटचा वापर करून महिलेच्या बँकेच्या खात्यातून १० लाख ३० हजार रूपये स्वत:कडे वळते करून घेतले.

### पाणीसाठ्यात वाढ, कपातीचे संकट टळले

# जोर वाढला, पवना धरण क्षेत्रात संततधार!

## मागील चोवीस तासात 55 मिली मीटर पावसाची नोंद

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

पिंपरी-चिंचवडसह मावळवासीयांची तहान भागविणा-या पवना धरण परिसरात पावसाचा जोर वाढला आहे. मागील चोवीस तासात 55 मिली मीटर पावसाची नोंद झाली आहे. त्यामुळे धरणातील पाणीसाठा 2.6 टक्क्यांनी वाढला आहे. तर, मागील चोवीस तासात लोणावळा परिसरात 146 मिली मीटर पावसाची नोंद झाली आहे. पिंपरी-चिंचवडसह मावळ भागातील विविध गावांचा पाण्याचा मुख्य स्रोत पवना धरण आहे. महापालिका सध्या धरणातून 510 एमएलडी पाणी उचलते. शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी पवना नदीवरील रावेत – पुनावळे दरम्यान असलेल्या बंधा-यातून अशुद्ध जलउपसा करण्यात येतो. (PAVANA DAM) सेक्टर 23 निगडी येथे पाणी शुद्ध करुन शहरवासीयांना पुरवठा केला जातो. यंदा उन्हाळा तीव्र होता. जून महिन्यात पाऊस पडला नाही. त्यामुळे पाणी कपातीचे संकट आले होते. परंतु, 1 जुलै पासून पावसाला सुरुवात झाली.



पिंपरी-चिंचवडसह मावळ भागातील विविध गावांचा पाण्याचा मुख्य स्रोत पवना धरण आहे. महापालिका सध्या धरणातून 510 एमएलडी पाणी उचलते. शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी पवना नदीवरील रावेत – पुनावळे दरम्यान असलेल्या बंधा-यातून अशुद्ध जलउपसा करण्यात येतो.

- गेल्या 24 तासात झालेला पाऊस = 55 मि.मि.
- 1 जूनपासून झालेला पाऊस = 392 मि.मि.
- गेल्या वर्षी आजच्या तारखे पर्यंत झालेला एकूण पाऊस = 545 मि.मि.
- धरणातील सध्याचा पाणीसाठा = 19.45 टक्के
- गेल्या वर्षी आजच्या तारखेचा धरणातील पाणीसाठा = 34.28 टक्के
- गेल्या 24 तासात पाणीसाठ्यात झालेली वाढ = 2.6 टक्के
- 1 जूनपासून पाणीसाठ्यात झालेली वाढ = 2.6 टक्के

### दोन दिवसांपासून शहरात संततधार, थेरगावमधील डांगेचौक परिसरातही रस्त्यावर झाड कोसळले

# पिंपळे सौदागरमध्ये कारवर झाड कोसळले !

## सुदैवाने कोणतीही जिवीतहानी नाही, नागरिकांनी खबरदारी घ्यावी

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

पिंपरी-चिंचवड शहरात गेल्या दोन दिवसांपासून जोरदार पावसाने हजेरी लावली आहे. सुरू असलेल्या पावसामुळे पिंपळे सौदागर येथे एक मोठे झाड कारवर कोसळल्याची घटना घडली आहे. सुदैवाने यात कोणतीही जिवीतहानी झाली नसून कारचे मात्र मोठं नुकसान झाले आहे. दरम्यान थेरगाव मधील डांगेचौक परिसरातही रस्त्यावर एक झाड कोसळल्याची घटना आज घडली आहे.

प्रभाग २८ रहाटणी-पिंपळे सौदागर येथील फाईव्ह गार्डन सोसायटीमध्ये पावसामुळे झाड पडल्याची घटना घडली आहे. यात कोणतीही जिवितहाणी झाली नसून हे झाड सोसायटीतील सभासदाच्या चारचाकी गाडीवर कोसळल्याने गाडीचे मोठं नुकसान झाले आहे. माजी विरोधी पक्षनेते नाना काटे यांनी घटनेची माहिती मिळताच महापालिकेच्या उद्यान विभागाला संपर्क साधून झाड त्वरित हटविण्याच्या सूचना केल्या. यावेळी नाना काटे सोशल फाऊंडेशनच्या टीमने घटनास्थळी जाऊन झाड हटविण्यासाठी मदत केली.



### थेरगावमध्येही झाड कोसळल्याची घटना

तसेच थेरगाव येथील डांगे चौका जवळील भोईर एस्टेट या सोसायटीच्या मुख्य रस्त्यावरिल गुलमोहराचे झाड पावसामुळे सकाळी ७ वाजण्याच्या सुमारास अचानक कोसळले. याघटनेत देखील सुदैवाने कोणतीही जीवितहाणी झाली नाही. मात्र झाड रस्त्यात कोसळल्याने येथील सर्व सोसायटीचा रस्ता पूर्ण बंद झाला होता.

## संपादकीय »

# वरून कीर्तन; आतून तमाशा

***भारतात धंदा करणाऱ्या समाज माध्यमांमधील कंपन्या वारंवार केंद्र तसेच विविध राज्य सरकारांच्या विरोधात न्यायव्यवस्थेकडे धाव घेत आहेत. या बहुराष्ट्रीय कंपन्यांचा व्यवसाय कोट्यवधी डॉलरचा आहे आणि त्यांनी जगाला कवेत घेतले आहे. खरेतर, ही सगळी 'माध्यमे' आहेत. माहिती किंवा ज्ञान दुसरीकडेच जन्म घेते.***

त्यासाठी कष्ट घेणारेही निराळेच असतात किंवा विकृत माहिती वा ज्ञानाभासाला जन्म देणारेही वेगळे आहेत. या साऱ्या कंपन्यांचे खरे काम 'मी तो हमाल भारवाही' इतकेच आहे. मात्र, आता त्यांना आपण अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे फार मोठे रखवालदार असल्याचा साक्षात्कार होतो आहे. भारतात गेल्या दीड ते दोन वर्षात अनेक कंपन्यांनी देशातील विविध न्यायालयांमध्ये सरकारी नियम आणि कायदे यांना आव्हान दिलेले दिसेल. काही प्रकरणे तर या आधीच सर्वोच्च न्यायालयात पोहोचली आहेत. आता ट्वीटर या जगातल्या मायक्रो ब्लॉगिंगमधल्या सर्वात मोठ्या कंपनीने केंद्र सरकारच्या विरोधात कर्नाटक उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. मागे या कंपन्यांनी सरकारी नियम पाळण्याचे आश्वासन केंद्र सरकारला दिले होते. पण आता संधी मिळताच न्यायालयीन लढाई उभी करण्यात आली. ही अभिव्यक्ती किंवा व्यक्तिस्वातंत्र्याची लढाई नाही. तशा भ्रमात कुणी राहू नये. आपला धंदा बुडू नये किंवा त्याच्या वाढीवर मर्यादा पडू नये, या निव्वळ व्यापारी हेतूने या लढाया उभ्या केल्या जातात. 'तुम्ही अनेकदा मूक समाजाचा आवाज बनता हे खरे असले तरी तुमच्या माध्यमातून अनेकदा आक्षेपार्ह आणि प्रक्षोभक मजकूर समाजात फिरतो. त्याची जबाबदारी कुणाची?' अशा शब्दांत मागे सर्वोच्च न्यायालयाने 'फेसबुक' या ट्वीटरच्या मोठ्या भावंडाचे कान पिळले होते. जूनमध्ये केंद्रीय माहिती तंत्रज्ञान खात्याने आक्षेपार्ह मजकूर काढून न टाकल्याबद्दल ट्वीटरला नोटीस बजावली होती. तसेच, मजकूर काढला नाही तर फौजदारी कारवाई करण्याचा इशाराही दिला होता. तेव्हा ट्वीटरने काहीशी माघार घेतल्यासारखे दाखविले आणि ही नियमावली मान्य असल्याचे दाखवले. आता मात्र, केंद्र सरकार अधिकारांचा गैरवापर करून दडपशाही करीत असल्याची तक्रार कंपनी करीत आहे. सरकारने काही खाती पूर्णपणे बंद करण्याचा आदेश कंपनीला दिला आहे. त्याबद्दलही कंपनी नाराज आहे. मात्र, केंद्र सरकारची किंवा कोणत्याही यंत्रणांची मनमानी होऊ द्यायची नसेल तर सर्वच समाज माध्यमांनी स्वयंशिस्त पाळायला हवी. गेली दोन दशके ही अपेक्षा वारंवार व्यक्त करूनही फारसे काही झालेले नाही. त्यामुळे, कोणत्याही पक्षाचे सरकार आले तरी त्याला समाज माध्यमांचे स्वैर वर्तन सहन करता येणार नाही. भारतात वारंवार न्यायालयीन लढाया उभ्या करणाऱ्या या कंपन्यांना परदेशांमध्ये कठोर नियम पाळावे लागतात. चीन किंवा उत्तर कोरियाचा तर प्रश्नच नाही.



## आनंदी सकाळ

# अन् आनंदे तुडवावी पंढरीची वाट...

वारकरी हो आणि पंढरीला जा, असे तुकोबा द्विरुक्तीने म्हणजे आग्रहाने सांगतात. वारकरी हा महाराष्ट्राचा अभिमानाचा विषय. वारकऱ्यांची लक्षणेही तुकोबांनी सांगून ठेवली. खांद्यावर भगवी पताका, गळ्यात तुळशीमाळ, पंढरीची पायी वारी करणे, पंढरपूरला गेल्यावर चंद्रभागेच्या वाळवंटात देहभान विसरून नाचायचे. असे धुंद नाचल्यानंतर चंद्रभागेत स्नान करून मग कटीवर हात ठेवून उभा असलेल्या सावळ्या पांडुरंगाचे दर्शन घ्यायचे!

भगवी पताका वैराग्याचे प्रतीक. भगवी पताका खांद्यावर घेऊन निघायचे तर आधी ज्ञानोत्तर भक्ती संपादन करावी लागते. त्यासाठी वारकऱ्याने आजीवन एकादशी व्रत नेमाने पाळायचे असते. विवेक जागृत करावा लागतो. मग वैराग्य आपसूक येते. वैराग्याची भगवी पताका खांद्यावर घेतली की, तुळशीमाळ घालायची. विठोबाच्या दर्शनासाठी घरादारावर तुळशीपत्र ठेवण्याचा निर्धार करावा लागतो. भोगांचा त्याग करायला शिकावे लागते. नंतर पंढरीची वाट पायी तुडवायची असते.परमार्थात नियम थोडाच करावा.

# सिग्नलवरील चिमुकल्यांच्या दुर्दशेला जबाबदार कोण?



## भूमिका

(भाग - 2) **गौरव जाधव**

91 88051 21395



सांस्कृतिक राजधानी, तसेच स्मार्ट सिटीकडे वाटचाल करणाऱ्या पुण्यात रस्त्यावर भीक मागणाऱ्यांचे प्रमाण वाढत आहे. पोलिसांनी भिकाऱ्यांवर कारवाई केल्यानंतर आता रस्त्यावर भीक मागण्यासाठी पालकांकडूनच लहान मुलांचा वापर केला जात असल्याचे समोर आले आहे.पुणे शहराचा विकास झपाट्याने होत आहे. टोलेजंग इमारती, मॉल, आयटी कंपन्या, शैक्षणिक संस्थांची संख्या वाढत आहे. त्यामुळे पुण्याला शिक्षणाचे माहेरघर, एक चांगले शहर म्हणून ओळखले जाते. परंतु, अलीकडे रस्त्यावर, चौका-चौकांत भीक मागणाऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. त्यामध्ये प्रामुख्याने लहान मुलांचा मोठ्या प्रमाणात सहभाग दिसतो. चौकांबरोबरच गर्दीचे रस्ते, मॉल, चित्रपटगृहांचा परिसर अशा ठिकाणी भीक मागणाऱ्यांची संख्या वाढली आहे. सिग्नलवर थांबून रस्त्यावर भीक मागणाऱ्या त्या लहान मुलांची काय चूक... उद्या मोठी झाली कि ती काही भीक नाहीत मागणार... त्या वेळेस त्यांना मात्र कळायला लागेल आणि त्या गोष्टीची लाज वाटू लागेल पण ती चांगल्या मार्गी नाहीत लागणार... मग् ती चोऱ्या माऱ्या करणार... आणि अशाच मार्गांवर ती चालत राहणार...आणि ती पण उद्या हेच बोलणार कि यात आमची काय चूक... खरंच यात त्यांची काय चूक... आणि ज्यांनी या चुका केल्या आहेत त्यांच काय???? खरं तर या गोष्टीला आळा बसणं फार गरजेचं आहे कारण मी पाहिलेलं हे एकाच दृश्य नाही पुण्यात अनेक सिग्नल वर तुम्हाला हे विदारक रूप पहायला मिळेल... हीच गोष्ट आणि असेच प्रकार... कदाचित या पेक्षा भीषण... कारण मी एकदा कात्रजच्या सिग्नलला सहा मुले पाहिली होती... त्यांची आई पण एकच होती... आणि ती पण एका चार महिनाच्या मुलाला मांडीवर घेऊन बसली होती.

गंम्मत म्हणजे सरकार लोकसंख्या नियंत्रण करत आहेत... त्यासाठी त्यांनी फक्त दोन मुले बस असा नियम काढला आहे... हम दो हमारे दो... आणि हो जर तिसरं झालं तर तुमचं राशन बंद... तुम्हाला मिळणारी सगळी सवलत बंद... वगैरे वगैरे. खरं तर आता सुशिक्षित वर्ग आणि त्यातल्या त्यात मध्यम वर्ग एकच मुलावर समाधानी आहे... कारण त्यांना माहिती आहे कि मुलं जन्माला घालणं सोपं आहे परंतु त्यांना चांगल जीवन आणि शिक्षण आपण नाही देऊ शकत... आपण एका मुलाला ते सगळं देऊ शकतो आणि ते असा विचार करून एका मुलात समाधान मानतात मग् तो मुलगा असो वा मुलगी...सरकार अशा लोकांवर बंधन आणून लोकसंख्या नियंत्रण करतंय खरं पण या सिग्नल वर असणाऱ्या या लोकांचं काय ज्यांना पाच-सहा मुलं आहेत... त्याच्यावर काय बंधन आणणार... त्यांच्या कोणत्या सवलती बंद करणार... त्यांच्यावर कसा आळा घालणार... रोख लावणार... आणि अशा या भीक मागायाला लागणाऱ्या मुलांची संख्या कशी आणि कधी कमी होणार... याला कोण जबाबदार? हे एकच प्रश्न गेली कित्येक दिवस सतावत आहे...

# एकनाथी रामायण!

महाराष्ट्राच्या राजकारणात धक्कातंत्राची मालिका खऱ्या अर्थाने आता रंगली आहे. राजकारणात अनपेक्षित धक्के कसे बसतात, दिग्गजांनी व्यक्त केलेले अंदाज फोल कसे ठरतात हे दर्शविणारे मासलेवाईक उदाहरण म्हणजे गुरुवारी घडलेल्या राजकीय घटना.



प्रत्येक नावापुढे दरवेळी 'साहेब' हे पालुपद लावण्याची अत्यंत कृत्रिम प्रथा विधिमंडळात बोकाळली असून तिला अजित पवारांसहित सगळे नेते बळी पडले आहेत. या पार्श्वभूमीवर नवे आणि ताज्या दमाचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जी चौफेर, मनसोक्त, मार्मिक टोलेबाजी केली; ती त्यांचे आजवरचे अप्रकाशित रूप दाखविणारी होती. रविवारी विधानसभेच्या अध्यक्षांची निवड सहजसोपी ठरल्याने विश्वास ठराव ही औपचारिकता होती. ती पार पडली. या ठरावावर एकेक खंदे, आक्रमक आणि अनुभवी वक्ते बोलल्यानंतर मुख्यमंत्री काय व कसे बोलतात, याची साऱ्यांना उत्सुकता होती. त्यातच एकनाथ शिंदे हे कमी बोलतात आणि इतरांचे ऐकतानाही शक्यतो चेहरा निर्विकार ठेवतात. असे असताना ठरावावरील आभाराच्या भाषणाने शिंदे यांनी आधीची सगळी भाषणे पुरती निष्प्रभ करून टाकली. शिवसेनेतले सर्वांत मोठे बंड सर्वांत यशस्वी करणारे एकनाथ शिंदे बंडाच्या हालचालींचा 'काही तपशील सांगायचा आणि काही आवरता घ्यायचा' असे करत बऱ्याच गोष्टी मोकळेपणाने सांगत होते. त्यांचे शेजारी देवेंद्र फडणवीस यांना आता 'हे सगळेच सांगून टाकतात की काय...' अशी चिंता पडत होती. मात्र, सभागृहाला विश्वासात घेण्याची, बंडामागची भूमिका समजावून देण्याची आणि जागच्या जागी विविध पक्षांच्या सदस्यांची साक्ष काढण्याची अशी बिनधास्त, अनौपचारिक शैली सभागृहाने बऱ्याच वर्षांत पाहिली नव्हती. त्यामुळेच, वरवर विस्कळित वाटणारे त्यांचे भाषण आतून येत होते. कोंडलेल्या वाफेला दीर्घकाळाने वाट मिळावी, तसे ते बाहेर ओसंडत होते आणि त्याचवेळी, ते 'माझे दरवाजे सर्वांसाठी २४ तास उघडे आहेत' असे सांगून सर्वांना आश्वस्त करीत होते. काही सदस्यांनी उगाच राणा भीमदेवी थाट चढवून अनावश्यक आक्रस्ताळी भाषणे केली. त्यांची आवश्यकता नव्हती. या उलट, सभागृहाच्या बाहेर आदित्य ठाकरे यांनी पोक्तपणा दाखवून अचानक समोर आलेल्या बंडखोर आमदार प्रकाश सुर्वे यांच्याशी हस्तांदोलन करून 'त्या दिवशी आपल्याला एकत्र जेवायचे होते. पण तुम्ही असे कराल असे वाटले नव्हते,' असे म्हणत नाराजीला वाट दिली पण संवादाचा मार्ग बंद केला नाही. मात्र, सभागृहात ठाकरे गटाचे भास्करराव जाधव यांचा आवेश अतिनाट्यमय होता. एकीकडे, सत्तांतराची आणि विश्वास ठरावाची लगबग चालू असली तरी महाराष्ट्रात पुरेसा पाऊस झालेला नाही आणि मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री या दोघांनीही तातडीने आपत्ती व्यवस्थापनाची बैठक घ्यावी, ही काँग्रेसचे गटनेते बाळासाहेब थोरात यांची सूचना अधिक वास्तववादी होती. विरोधी पक्षनेतेपदी निवड झाल्यानंतरच्या भाषणात अजित पवार यांनाही ती उचलून धरावी लागली.

## ।। अभंगवाणी ।।



देवाच्या प्रसादें करा रे भोजन ।<br>
व्हाल कोण कोण अधिकारी ते ॥१॥<br>
ब्रम्हादिकांसि हें दुर्लभ उच्छिष्ट ।<br>
नका मानूं वीट ब्रम्हरसीं ॥धृ.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

### रेल्वेची धडक बसल्याने दोन माकडांचा मृत्यू



।सांगली ।महाईन्यूज ।

भरधाव रेल्वेने धडक दिल्याने दोन माकडांचा गुरुवारी दुपारी बळी गेला, तर एक पिलू गंभीर जखमी झाले. ही घटना मिरजेजवळ इनाम धामणी हद्दीत घडली. आज दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास वीस ते पंचवीस माकडांचा कळप लोहमार्गावर होता. याचवेळी कोल्हापूरहून गोंदियाला जाणारी महाराष्ट्र एक्सप्रेस मिरजेकडे येत होती. धामणीला जाणाऱ्या भुमीगत रस्त्यावरील पुलावर असलेला कळप रेल्वे आल्याने लोहमार्गावरुन धावत सुटला. या दरम्यान भरधाव रेल्वेची धडक बसल्याने दोन माकडे रुळालगत गंभीर जखमी होऊन पडली, तर एका पिलाची शेपटी तुटून पडली. नागरिकांनी तात्काळ लोहमार्गावर धाव घेतली. त्यावेळी गंभीर अवस्थेतील मादीला पाणी पाजण्यात आले, मात्र फार काळ जिवंत राहू शकली नाही. उपचार करण्यासाठी जखमी पिलाला ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला.

### पेट्रोल -डिझलेच्या दरवाढीचा फटका सर्वसामान्यांना, महागाईनेही उच्चांक गाठला

# पुढच्या 5 वर्षात देशातील पेट्रोल हद्दपार होईल!

## केंद्रीय दळणवळण मंत्री डॉ. नितीन गडकरींचे भाकीत

।अकोला ।महाईन्यूज ।

देशातील पेट्रोल -डिझलेच्या दरवाढीचा फटका सर्वसामान्यांना बसत असून महागाईनेही उच्चांक गाठला आहे. त्यामुळे, 2 रुपयांनीही इंधनाचे दर कमी झाले तरी सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा वाटतो. एकीकडे इंधन दरवाढीवरुन सरकारसह नागरिकही त्रस्त असतानाच, आता केंद्रीय दळणवळणमंत्री नितीन गडकरी यांनी मोठं विधान केलं आहे. पुढच्या पाच वर्षांत देशातील पेट्रोल हद्दपार होईल, असा विश्वास गडकरींनी व्यक्त केला आहे. डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचा ३६ वा दीक्षान्त समारंभ गुरुवारी येथे पार पडला, यावेळी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. यावेळी, कृषी विद्यापीठाकडून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना ‘डॉक्टर ऑफ सायन्स’ पदवीने सन्मानित केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपती भगतसिंह कोश्यारी, सन्माननीय अतिथी म्हणून पद्मश्री डॉ. मोतीलाल मदान, कुलगुरू डॉ. विलास भाले, कुलसचिव डॉ. सुरेंद्र काळबांडे हे उपस्थित होते. पुढे बोलताना गडकरी म्हणाले की, आता गाड्यांमध्ये विदर्भात तयार केलेल्या



डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचा ३६ वा दीक्षान्त समारंभ गुरुवारी येथे पार पडला, यावेळी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. यावेळी, कृषी विद्यापीठाकडून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना ‘डॉक्टर ऑफ सायन्स’ पदवीने सन्मानित केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपती भगतसिंह कोशारी, सन्माननीय अतिथी म्हणून पद्मश्री डॉ. मोतीलाल मदान, कुलगुरू डॉ. विलास भाले, कुलसचिव डॉ. सुरेंद्र काळबांडे हे उपस्थित होते. पुढे बोलताना गडकरी म्हणाले की, आता गाड्यांमध्ये विदर्भात तयार केलेल्या बायो इथेनॉलचा वापर होत आहे. विहिरीतील पाण्याच्या माध्यमातून ग्रीन हायड्रोजन तयार करून ७० रुपये प्रतिकिलो विक्री होऊ शकते, याच्या अधिक वापरामुळे कोणी पेट्रोल-डिझेलचा वापर करणार नाही. पुढच्या पाच वर्षांत देशातील पेट्रोल हद्दपार होईल.

बायो इथेनॉलचा वापर होत आहे. विहिरीतील पाण्याच्या माध्यमातून ग्रीन हायड्रोजन तयार करून ७० रुपये प्रतिकिलो विक्री होऊ शकते, याच्या अधिक वापरामुळे कोणी पेट्रोल-डिझेलचा वापर करणार नाही. पुढच्या पाच वर्षांत देशातील पेट्रोल हद्दपार होईल, आता फक्त गहू, तांदूळ, मका लावून कोणी भविष्य बदलू शकत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी अन्नदाता नाही, ऊर्जा दाता बनण्याची गरज असल्याचे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी सांगितले.नोकरी मागणारे नको, नोकरी देणारे बनाइथेनॉलच्या एका निर्णयाने देशातील २० हजार कोटीची बचत झाली. येत्या काळात दुचाकी, चारचाकी गाड्या ग्रीन हायड्रोजन, इथेनॉल, सीएनजीवर असणार आहेत. विदर्भातील कापूस बांग्लादेशात निर्यात करण्याची योजना बनविली असून, याकरिता विद्यापीठांचा सहयोग आवश्यक आहे. विदर्भातील शेतकऱ्यांची आत्महत्या पूर्णत: थांबविण्यासाठी विद्यापीठ मोठे सहकार्य करू शकते. त्यामुळे नोकरी मागणारे नाही, तर नोकरी देणारे बना, असेही ते म्हणाले. यावेळी सर्व विभागाचे अधिष्ठाता, कार्यकारी परिषदेचे सभासद यांचीही उपस्थिती होती.‘डॉक्टर ऑफ सायन्स’ पदवीने सन्मानितकृषी विद्यापीठाकडून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना ‘डॉक्टर ऑफ सायन्स’ पदवीने सन्मानित केले. यावेळी गडकरी यांनी ही पदवी स्वीकारत असताना मनात संभ्रम असल्याचे म्हटले. परंतु, कुलगुरू यांनी कार्यकारी परिषदेचा निर्णय सांगितला.

### नोकरी मागणारे नको, नोकरी देणारे बना

इथेनॉलच्या एका निर्णयाने देशातील २० हजार कोटीची बचत झाली. येत्या काळात दुचाकी, चारचाकी गाड्या ग्रीन हायड्रोजन, इथेनॉल, सीएनजीवर असणार आहेत. विदर्भातील कापूस बांग्लादेशात निर्यात करण्याची योजना बनविली असून, याकरिता विद्यापीठांचा सहयोग आवश्यक आहे. विदर्भातील शेतकऱ्यांची आत्महत्या पूर्णत: थांबविण्यासाठी विद्यापीठ मोठे सहकार्य करू शकते. त्यामुळे नोकरी मागणारे नाही, तर नोकरी देणारे बना, असेही ते म्हणाले. यावेळी सर्व विभागाचे अधिष्ठाता, कार्यकारी परिषदेचे सभासद यांचीही उपस्थिती होती.

### ‘डॉक्टर ऑफ सायन्स’ पदवीने सन्मानित

कृषी विद्यापीठाकडून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना ‘डॉक्टर ऑफ सायन्स’ पदवीने सन्मानित केले. यावेळी गडकरी यांनी ही पदवी स्वीकारत असताना मनात संभ्रम असल्याचे म्हटले. परंतु, कुलगुरु यांनी कार्यकारी परिषदेचा निर्णय सांगितला. त्यावेळी याबद्दल सन्मान व ऋण व्यक्त करण्याकरिता कार्यक्रमात सहभागी झाल्याचे त्यांनी सांगितले.

# कोल्हापूर, सांगलीतील पुराचे पाणी मराठवाड्याकडे वळवण्यावर चर्चा

## डीपीआर तयार करण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश

।कोल्हापूर ।महाईन्यूज ।

राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आजपासून मंत्रालयातील आपल्या दालनातून कामास सुरुवात केली. त्यांनी आज राज्यात सध्या सुरु असलेल्या तसेच इतर प्रकल्पांचा आढावा घेण्यासाठी बैठक घेतली. या बैठकीत कोल्हापूर तसेच सांगली जिल्ह्यातील महापूर तसेच अतिवृष्टीचे पाणी मराठवाड्याकडे वळवण्यासाठीच्या योजनेवर चर्चा करण्यात आली.

या योजनेचा डीपीआर तयार करावा, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. याबाबत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माहिती दिली आहे. ते बैठक संपल्यानंतर मुंबईत



पत्रकारांशी बोलत होते.

यावेळी बोलताना फडणवीस यांनी “आज जागतिक बँकेसोबत आणखी एक बैठक झाली. मागील काळात सांगली आणि कोल्हापूरला पूर आला होता. दरवर्षी असाच पूर आला, तर काय करायचे यावर आपण अभ्यास केला होता. जागतिक बँकेच्या मदतीने आपण एक अप्रुव्हल घेतलं होतं.

यामध्ये वळण बंधारे आणि टनेल सिस्टीमच्या माध्यमातून पाणी मराठवाड्याकडे वळवता येईल का? यावर अभ्यास करण्यात आला,” अशी माहिती दिली.

तसेच, “सांगली आणी सोलापूर भागातील जे पुराचं पाणी आहे; ते महाराष्ट्र आणि कर्नाटक यांच्या हिश्श्याव्यतिरिक्त आहे. तेव्हा आपण त्यावर अभ्यास केला होता. आज पुन्हा एकदा जागतिक बँकेसोबत आपण बैठक घेतली. त्यांची या प्रकल्पाला मदत करण्याची पूर्ण तयारी आहे. मुख्यमंत्र्यांनी यासंदर्भातही निर्देश दिले आहेत. त्यामुळे याचा डीपीआर तयार करुन जागतिक बँकेकडे देण्यात यावा, असे निर्देशही देण्यात आले आहेत,” असे फडणवीस यांनी सांगितले.

“वाहून जाणारे जे पाणी आहे, ते गोदावरीच्या खोऱ्यात नेण्यासंदर्भात याआधी कारवाई केली होती. ती कारवाई पुन्हा सुरु करण्याबाबत आम्ही आढावा घेतला. हे काम टेंडर स्टेजपर्यंत घेऊन जावं, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. वळणगंगा नळगंगा नदीजोड प्रकल्पात गोसीखुर्दच्या खाली वाहून जाणारं पाणी आहे, ते टनेलच्या माध्यमातून ४५० किमी आणायचे नियोजन होते.

यामुळे जवळजवळ ५ ते ६ जिल्ह्यांना फायदा होणार होता. त्याचाही आज आढवा घेण्यात आला.

हा प्रकल्प प्रशासकीय मान्यतेकरीता सादर करावा, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत,” असे फडणवीस यांनी सांगितले.

## शॉर्ट न्यूज »

### ‘डीजीसीए’ची स्पाईसजेटला नोटीस



।नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

गेल्या १८ दिवसांत आठ विमानांमध्ये तांत्रिक बिघाडाच्या घटनांमुळे विमान वाहतूक नियामकाने (डीजीसीए) बुधवारी स्पाईसजेटला कारणे दाखवा नोटीस बजावली. स्पाईसजेट एअरलाईन्स विमान नियम, १९३७ च्या ११ व्या अनुसूची आणि नियम १३४ च्या अटींनुसार सुरक्षित, दक्ष आणि विश्वसनीय विमान सेवा देण्यात अपयशी ठरली आहे, असे नोटिशीत नमूद करण्यात आले आहे. तांत्रिक बिघाडाच्या घटनांची समीक्षा केल्यानंतर स्पाईस जेटने आंतरिक सुरक्षा आणि देखभालीसाठी योग्य पावले उचलली नाहीत. त्यामुळे प्रवाशांच्या सुरक्षेत त्रुटी आढळल्या, असे ‘डीजीसीए’ने या नोटीसमध्ये म्हटले केले असून उत्तर देण्यासाठी तीन आठवड्यांची मुदत दिली आहे.

### यशवंत सिन्हा की द्रौपदी मुर्मू यांना पाठिंबा देणार याबाबत संभ्रम

# राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत मुर्मूंना पाठिंबा देण्याची मागणी!

### राहुल शेवाळे यांनीही पत्राद्वारे मुर्मू यांना पाठिंबा देण्याची विनंती केली होती

।नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

१८ जुलै रोजी होणाऱ्या देशाच्या राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीसाठी एनडीएने आदिवासी नेतृत्व म्हणून द्रौपदी मुर्मू यांना उमेदवारी दिली आहे. अशा परिस्थितीत मुर्मू यांना एनडीएमध्ये सामील असलेल्या पक्षांचा पाठिंबा मिळत आहे. तसेच आदिवासी चेहऱ्यामुळे इतर पक्षही साथ देत आहेत. त्याचवेळी शिवसेनेच्या एकनाथ शिंदे गटानेही द्रौपदी मुर्मू यांना पाठिंबा जाहीर केला आहे.

शिंदे गटाच्या या घोषणेनंतर शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या गोटात अस्वस्थता निर्माण झाली आहे. या निवडणुकीत विरोधकांनी यशवंत सिन्हा यांना उमेदवारी दिली आहे. अशा परिस्थितीत काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेससह महाराष्ट्रात सरकारमध्ये सहभागी असलेली उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना यशवंत सिन्हा की द्रौपदी मुर्मू यांना पाठिंबा देणार याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे.



मात्र, याआधी शिवसेना खासदार राहुल शेवाळे यांनी पक्षाध्यक्ष उद्धव ठाकरे यांना पत्र लिहून द्रौपदी मुर्मू यांना पाठिंबा जाहीर करण्याची विनंती केली होती. त्यानंतर आता आणखी एका खासदाराने द्रौपदी मुर्मू यांना पाठिंबा देण्याबाबत भाष्य केले आहे. पालघरचे शिवसेनेचे खासदार राजेंद्र गावित यांनी द्रौपदी मुर्मू यांना पाठिंबा देण्याची विनंती केली आहे.

“राजकीय दृष्ट्या काही असले तरी पहिल्यांदाच आदिवासी महिलेला राष्ट्रपती पदासाठी उमेदवारी मिळालेली आहे. उद्धव ठाकरेंनी मन मोठे करुन त्यांना पाठिंबा द्यावा. त्यांना पाठिंबा दिल्यास संपूर्ण आदिवासी समाज उद्धव ठाकरेंचे स्वागत करेल. मला विश्वास आहे की ते याबाबत निर्णय घेतील,” असे राजेंद्र गावित यांनी म्हटले.

याआधी शिवसेनेचे लोकसभा खासदार राहुल शेवाळे यांनी मंगळवारी रात्री उद्धव यांना पत्र लिहून मुर्मू यांना पाठिंबा देण्याची विनंती केली. पत्रात त्यांनी उद्धव यांना पक्षाच्या खासदारांना मुर्मू यांना पाठिंबा देण्याचे आवाहन केले आहे. ज्याप्रमाणे बाळासाहेब ठाकरेंनी प्रतिभा पाटील आणि प्रणव मुखर्जी यांना पाठिंबा दिला होता, त्याप्रमाणे राजकीय मतभेदांव्यतिरिक्त द्रौपदी मुर्मू यांना पक्षाच्या खासदार म्हणून मत द्या, असे राहुल शेवाळे यांनी म्हटले आहे. राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत भाजपप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या उमेदवार द्रौपदी मुर्मू यांना पाठिंबा देण्यासंबंधी खासदार राहुल शेवाळे यांनी घेतलेली भूमिका योग्यच असल्याचे मत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाण्यात पत्रकारांशी बोलताना व्यक्त केले. तसेच आम्ही शिवसेना अद्याप सोडलेली नसून आम्ही शिवसेनेतच असल्याचा पुर्नउच्चार करत पक्षातून आणखी कितीजणांना पदावरून हटवणार, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला आहे.“आदिवासी समाजातील महिला पहिल्यांदाच राष्ट्रपती होणार असून ही देशाच्या दृष्टिकोनातून महत्त्वाची गोष्ट आहे. आदिवासी समाजाने मुख्य प्रवाहात यावे यासाठी विविध योजना राबविण्यात येतात. परंतु या समाजातील द्रौपदी मुर्मू यांना राष्ट्रपतीपदाची उमेदवारी देण्याचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मोठा निर्णय घेतला असून हा त्या समाजाचा मोठा बहुमान आहे.

> शिवसेनेचे लोकसभा खासदार राहुल शेवाळे यांनी मंगळवारी रात्री उद्धव यांना पत्र लिहून मुर्मू यांना पाठिंबा देण्याची विनंती केली. पत्रात त्यांनी उद्धव यांना पक्षाच्या खासदारांना मुर्मू यांना पाठिंबा देण्याचे आवाहन केले आहे. ज्याप्रमाणे बाळासाहेब ठाकरेंनी प्रतिभा पाटील आणि प्रणव मुखर्जी यांना पाठिंबा दिला होता, त्याप्रमाणे राजकीय मतभेदांव्यतिरिक्त द्रौपदी मुर्मू यांना पक्षाच्या खासदार म्हणून मत द्या, असे राहुल शेवाळे यांनी म्हटले आहे.

# ब्रिटनमध्ये राजकीय संकट!

### 40 पेक्षा जास्त मंत्र्यांच्या बंडखोरीनंतर पंतप्रधान बोरिस जॉन्सन राजीनामा देण्याची शक्यता

। ब्रिटन । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

ब्रिटनचे पंतप्रधान बोरिस जॉन्सन आज राजीनामा देण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. गेल्या २४ तासात पंतप्रधान बोरिस जॉन्सन यांच्या सरकारमधून बंडखोरी करत ४० पेक्षा जास्त मंत्र्यांनी राजीनामे दिले आहेत.

परिणामी बोरिस जॉन्सन यांचे सरकार कोसळण्याची शक्यता आहे. मात्र, पुढील पंतप्रधानांची घोषणा होईपर्यंत जॉन्सन पदभार सांभाळणार असल्याचे सांगण्यात येत आहे.



### महाराष्ट्रासारखेच ब्रिटनमध्येही राजकीय संकट

काही दिवसांपूर्वी महाराष्ट्रात आलेल्या राजकीय संकटाप्रमाणेच ब्रिटनमध्येही राजकीय संकट ओढवल्याचे दिसून येत आहे. महाराष्ट्रात शिवसेनेच्या ३९ आमदारांनी बंड केल्यामुळे महाविकास आघाडी सरकार कोसळले होते. परिणामी उद्धव ठाकरेंना मुख्यमंत्री पदाचा राजीनामा द्यावा लागला होता. त्याचप्रमाणे ब्रिटनचे पंतप्रधान बोरिस जॉन्सन यांच्या सरकारमधील ४० पेक्षा जास्त मंत्र्यांनी बंडखोरी करत राजीनामा दिला आहे. तसेच जॉन्सन यांच्यावर विश्वास नसल्याचाही आरोप या मंत्र्यांनी केला आहे. त्यामुळे बोरिस जॉन्सन यांच्या पंतप्रधानपदाच्या राजीनाम्याची मागणी जोर धरु लागली आहे.

### अर्थमंत्री, गृहमंत्र्यांचा राजीनामा

ब्रिटनचे अर्थमंत्री ऋषी सुनक यांनी सर्वप्रथम ५ जुलै रोजी आपला राजीनामा दिला होता. त्यानंतर आरोग्य मंत्री साजिद जाविद यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. महत्त्वाची बाब म्हणजे बोरिस जॉन्सन यांच्या कट्टर समर्थक समजल्या जाणाऱ्या गृहमंत्री प्रिती पटेल यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याने खळबळ उडाली आहे. गेल्या २४ तासांमध्ये जवळजवळ ४० पेक्षा जास्त मंत्र्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे.

### ब्रिटनच्या अर्थमंत्री पदी नदिम जहावी यांची नियुक्ती

ब्रिटनचे पंतप्रधान बोरिस जॉन्सन यांनी मंगळवारी ऋषी सुनक यांच्या जागी नदिम जाहवी यांची अर्थमंत्री म्हणून नियुक्ती केली आहे. ब्रिटनचे अर्थमंत्री ऋषी सुनक आणि आरोग्य मंत्री साजिद जाविद यांनी मंगळवारी पंतप्रधान बोरिस जॉन्सन यांच्यावरील विश्वास गमावल्याचे सांगत आपल्या पदांचा राजीनामा दिला होता. अर्थमंत्रीपदी नियुक्ती झाल्यानंतर नदिम जाहवी यांनी ट्वीट कत बोरिस जॉन्सन यांना पंतप्रधान पदाचा राजीनामा देण्याचा सल्ला दिला आहे.

# पश्चिम बंगालमध्ये तृणमूलच्या नेत्यासह तिघांची गोळ्या झाडून हत्या

### हत्येनंतर शिरच्छेद करण्याचा प्रयत्न

।नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

पश्चिम बंगालमधील दक्षिण २४ परगणा जिल्ह्यात तृणमूल काँग्रेसचे नेते स्वपन माझी आणि त्यांच्या दोन साथीदारांची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. अज्ञात हल्लेखोरांनी त्यांच्यावर अंदाधुंद गोळीबार केला. या हत्येमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. सकाळी माझी आपल्या दोन साथीदारांसह गाडीवर जात असताना आरोपींनी त्यांच्यावर गोळीबार करत त्यांची हत्या केली.

स्वपन माझी सकाळी पक्षाच्या बैठकीसाठी जात होते. त्यांच्यासोबत त्यांचे दोन साथीदारही होते. कचुआ परिसरातील पिअर पार्कजवळ पोहोचताच आरोपींनी माझी यांची गाडी अडवली आणि




त्यांच्यावर गोळीबार केला. या गोळीबारात तिघांचाही जागीच मृत्यू झाला. कॅनिंग पश्चिमचे आमदार परेशराम दास यांच्याकडे काही दिवसांपूर्वी स्वपन मांझी यांनी आपल्या हत्येची भीती व्यक्त केली होती. आपली हत्या होण्याची भीती त्यांना वाटत होती. परेशराम यांनी मांझी यांना पोलिसांकडे घेऊन जाण्याचे आश्वासनही दिले होते. मात्र, त्या अगोदरच त्यांची हत्या झाली. हल्लेखोर तिघांचाही शिरच्छेद करण्याचा प्रयत्न करत होते. मात्र गोळ्या आणि बॉम्बचा आवाज ऐकून गर्दी जमली आणि हल्लेखोर पळून गेले.

# लग्नानंतर पत्नीला घरकामात मदत करतोस का?’



बॉलिवूड अभिनेता राजकुमार राव हा लोकप्रिय अभिनेत्यांपैकी एक आहे. राजकुमार राव हा अवघ्या काही महिन्यांपूर्वीच त्याची प्रेयसी पत्रलेखासोबत विवाहबंधनात अडकला. त्यांच्या लग्नाचे अनेक फोटो त्यांनी सोशल मीडियावर शेअर केले. त्यासोबत ते दोघेही अनेकदा एकमेकांचे फोटो सोशल मीडियावर शेअर करताना दिसतात. नुकतंच एका मुलाखतीत राजकुमार रावने लग्नानंतर त्याच्या आयुष्यात काय बदल झाले? याबद्दल सांगितले आहे. नुकतंच इंडिया टुडे कॉन्क्लेव्ह ईस्ट २०२२ या कार्यक्रमादरम्यान राजकुमार रावने लग्नानंतर त्याच्या खासगी आयुष्याबद्दल सांगितले आहे. यावेळी राजकुमार राव म्हणाला, “मी पत्रलेखाला घरातल्या कामात मदत करतो. मी घरात सर्वसामान्यांप्रमाणे वावरतो. मी पडद्यावर नेहमी खऱ्याखुऱ्या भूमिका साकारतो.

# ‘मुरांबा’ मालिकेत लवकरच बरसणार प्रेमाचा पाऊस,

स्टार प्रवाह वाहिनीवरील मुरांबा ही मालिका अल्पावधीतच प्रेक्षकांच्या पसंतीस उतरताना पाहायला मिळत आहे. या मालिकेत रमा आणि अक्षयच्या जोडीने प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. सध्या या मालिकेत दोघांमधल्या प्रेमाचा आंबट गोड मुरांबा आता मुरायला लागल्याचे पाहायला मिळत आहे. रमाच्या अवखळ आणि निरागस स्वभावाने अक्षयला तिच्या प्रेमात पडायला भाग पाडलं आहे. आता मुरांबा मालिकेत लवकरच प्रेमाचा पाऊस बरसणार आहे. अक्षय आणि रमाच्या प्रेमाच्या या नात्याची गोड सुरुवात वरुणराजाच्या हजेरीने होणार आहे. सध्या या मालिकेत मुकादम कुटुंब पिकनिकसाठी निघालं आहे. मुसळधार पावसात पिकनिकचा आनंद काही औरच असतो.



# तुझ्या माझ्या संसाराला... फेम अमृता पवार अडकली विवाहबंधनात

झी मराठीवरील एकत्र कुटुंब पद्धतीचं दर्शन घडवणारी ‘तुझ्या माझ्या संसाराला आणि काय हवं’ ही मालिका अल्पावधीतच प्रेक्षकांच्या पसंतीस पडली आहे. या मालिकेतील अदिती आणि सिद्धार्थ ही जोडी प्रेक्षकांच्या पसंतीस उतरताना दिसत आहे. या मालिकेत अदितीची भूमिका अभिनेत्री अमृता पवार साकारताना दिसत आहे. अमृताने अल्पावधीतच अभिनय आणि सौंदर्याने प्रेक्षकांना भुरळ घातली. नुकतंच अमृता ही विवाहबंधनात अडकली आहे. अमृताने नील पाटीलसोबत लग्नगाठ बांधत नव्या संसाराला सुरुवात केली आहे. अमृता पवार ही इन्स्टाग्रामवर कायमच सक्रीय असते. अमृता आणि नीलचा विवाहसोहळा बुधवारी पार पडला. तिच्या या विवाहसोहळ्याचे काही खास क्षण तिने चाहत्यांसाठी शेअर केले आहेत. अमृताने इन्स्टाग्रामवर एक व्हिडीओ पोस्ट केला आहे. या व्हिडीओत तिच्या हळदीपासून लग्नापर्यंतची धामधूम पाहायला मिळत आहे. यात तिच्या लग्नाचे काही निवडक क्षण पाहायला मिळत आहेत.



# माऊलीच्या जयघोषात चिंब झाला संदीप



चित्रपट, मालिका, नाटक अशा सर्वच माध्यमांमध्ये आपल्या अभिनयाचा ठसा उमटवण्यात यशस्वी झालेला अभिनेता संदीप पाठक सध्या माऊलीच्या जयघोषात ब्रम्हरसात न्हाऊन गेला आहे. 'टाळी वाजवावी, गुढी उभारावी, वाट ही चालावी पंढरीची' अशीच काहीशी अनुभूती मागील काही दिवसांपासून अभिनेता संदीप पाठक घेत आहे. देवाची आळंदी येथून श्री संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीनं विठू माऊलीच्या दर्शनासाठी पंढरपूरच्या दिशेनं प्रस्थान केलं आणि अलंकापुरीहून वारकऱ्यांसोबत इंद्रायणी ते चंद्रभागा असा संदीपचाही प्रवास सुरू झाला. कपाळाला गोपीचंदन टिळा, हातात भगवी पताका, डोक्यावर वारकरी टोपी आणि सदरा असा वेश धारण केलेला संदीप सध्या 'लावूनी मृदुंग स्मृती टाळ घोष सेवू ब्रम्हरस आवडीने...' असाच काहीसा अनुभव घेत आहे. या प्रवासात एकीकडे संदीपला बालवारकरी भेटत आहेत, तर दुसरीकडे नव्वदी गाठत आलेल्या ज्येष्ठ वारकऱ्यांचा आशीर्वाद मिळत आहे. डोक्यावर तुळशी वृंदावन घेऊन वारीत चालणाऱ्या महिला वारकरी संदीपच्या मुखावरून हात फिरवत प्रेम देत आहेत. 'माऊली, माऊली'च्या गजरात भक्तिमय झालेल्या वातावरणात संदीपही जणू माऊलीमय झाला आहे. कधी हातात टाळ घेऊन, कधी खांद्यावर वीणा घेऊन, तर कधी पखवाजवर थाप मारत पाऊस-पाण्याची पर्वा न करता संदीपही या आनंद सोहळ्यात चिंब न्हाऊन गेला आहे.





इंदापुरमध्ये डोळ्याचं पारणं फेडणारा श्री संत तुकाराम महाराजांच्या पालखीचा 'गोल रिंगण सोहळा'ही संदीपनं डोळ्यांत साठवून ठेवला. 'येळकोट येळकोट जय मल्हार' म्हणत जेजुरीमध्ये संदीपनं बेल भंडारा उधळला. इतकंच काय तर गोंधळ्यांचं वाद्यही वाजवलं. या वाटेवर संदीपला त्याचे चाहते असलेल्या असंख्य वारकऱ्यांचं प्रेम मिळालं. बऱ्याच जणांनी संदीपचे चित्रपट आवर्जून पहात असल्याची प्रतिक्रिया दिली. वारकऱ्यांकडून मिळालेलं प्रेम पाहून भारावून गेलेला संदीप म्हणाला की, करोडपती माणसांनाही इतकं प्रेम मिळत नाही. एका फळ विक्रेत्यानं प्रेमानं दिलेली भेट संदीपनं विनम्रतापूर्वक स्वीकारली. दिवंगत अभिनेते सतीश तारे यांच्यानंतर तुमच्यासारखा नट पहिला नसल्याची प्रतिक्रिया त्या फळविक्रेत्यानं व्यक्त केली. तुमच्या रूपात इंडस्ट्रीला सच्चा कलाकार मिळाल्याची प्रतिक्रिया ऐकून संदीप खऱ्या अर्थानं धन्य झाला.

## शॉर्ट न्यूज »

### मलेशिया मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धा

**क्वालालम्पूर । महाईन्यूज**

दोन ऑलिम्पिक पदक विजेत्या पीव्ही सिंधूने बुधवारी मलेशिया मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेच्या पहिल्या फेरीत संघर्षपूर्ण विजय मिळवला. परंतु सायना नेहवालने सलग दुसऱ्या स्पर्धेत सलामीच्या सामन्यातच गाशा गुंडाळला. महिला एकेरीत सिंधूने चीनच्या ही बिंग जियाओला २१-१३, १७-२१, २१-१५ असे नामोहरम केले आणि दुसरी फेरी गाठली. लंडन ऑलिम्पिक कांस्यपदक विजेत्या सायनाने पहिला गेम जिंकूनही दक्षिण कोरियाच्या किम गा ईयूनविरुद्ध २१-१६, १७-२१, १४-२१ असा पराभव पत्करला. सायना मलेशिया खुल्या स्पर्धेतही पहिल्याच फेरीत गारद झाली होती. पुरुष एकेरीत एचएस प्रणॉय, बी साईप्रणीत आणि पारुपल्ली कश्यप यांनी दिमाखदार विजयांसह दुसरी फेरी गाठली. प्रणॉयने फ्रान्सच्या ब्राइक लेव्हर्डेझला २१-१९, २१-१४ असे नमवले. तसेच प्रणीतने ग्युटेमालानच्या केव्हिन कॉर्डनला २१-८, २१-९ असे पराभूत केले.

# भारतीय मुलींची लंकेत धडाकेबाज कामगिरी!

## टी 20 आणि एकदिवसीय मालिकेत गाजवले निर्विवाद वर्चस्व

**।पालेकेले । महाईन्यूज ।**

भारतीय पुरुष संघ इंग्लंड आणि आयर्लंड दौऱ्यावर असताना भारतीय महिलासंघ देखील श्रीलंकेच्या दौऱ्यावर होता. या दौऱ्यात प्रत्येकी तीन सामन्यांची टी २० आणि एकदिवसीय मालिका भारतीय मुलींना खेळायची होती. या दोन्ही मालिकांमध्ये भारतीय महिला संघाने धडकेबाज कामगिरी केली आहे. टी २० पाठोपाठ मुलींनी एकदिवसीय मालिकादेखील ३-० अशी जिंकली आहे.

कर्णधार हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वात मुलींनी आपल्या पहिल्याच दौऱ्यात आश्चर्यकारक कामगिरी केली आहे. तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात भारताने श्रीलंकेला २५६ धावांचे लक्ष्य दिले होते. कर्णधार हरमनप्रीत कौर (७५), शेफाली वर्मा (४९)



आणि पूजा वस्त्रकार (५६) यांच्या चमकदार फलंदाजीच्या बळावर भारताला आपला धावफलक अडीचशेपार नेण्यात यश आले होते. भारताने दिलेले २५६ धावांचे लक्ष्य पार करण्यासाठी मैदानात उतरलेल्या यजमान पूर्ण ५० षटके खेळता आली नाहीत.

श्रीलंकेचा संघ ४७.३ षटकांत सर्वबाद २१६ धावाच करू शकला. लंकेच्यावतीने निलाक्षी डी सिल्वाने सर्वाधिक ४८ (नाबाद) धावा केल्या. कर्णधार चामरी अथापथुनेदेखील ४४ धावांची खेळी केली. भारतीय संघाची कर्णधार हरमनप्रीत कौरला सामनावीर आणि मालिकावीराचा पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.

दरम्यान, तीन सामन्यांच्या मालिकेतील पहिले दोन एकदिवसीय सामने भारताने जिंकले होते. दुसऱ्या सामन्यात तर एकही गडी न गमावता १७४ धावांचे आव्हान ठेवले होते. त्या सामन्यात स्मृती मानधना आणि शफाली वर्मा यांनी ही किमया करून दाखवली होती.

### विम्बल्डन टेनिस स्पर्धा

## किरियॉस प्रथमच उपांत्य फेरीत; महिलांमध्ये हालेप, रायबाकिनाचे विजय

**। लंडन । महाईन्यूज ।**



ऑस्ट्रेलियाचा आघाडीचा टेनिसपटू निक किरियॉसने बुधवारी कारकीर्दीत प्रथमच ग्रँडस्लॅम स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला. त्याने विम्बल्डन स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत चिलीच्या ख्रिस्टियन गारिनवर सरळ तीन सेटमध्ये मात केली. तसेच महिलांमध्ये रोमेनियाची सिमोना हालेप व कझाकस्तानची एलिना रायबाकिना यांनीही स्पर्धेत आगेकूच केली.

पुरुष एकेरीच्या सामन्यात किरियॉसने गारिनचा ६-४, ६-३, ७-६ (७-५) असा दोन तास आणि १३ मिनिटांत पराभव केला. आक्रमक शैलीत खेळ करणारा किरियॉस दमदार सर्व्हिससाठी ओळखला जातो. त्याने गारिनविरुद्धच्या सामन्यात १७ एसेसची (प्रतिस्पर्ध्याला सर्व्हिस परतवण्यात अपयश) नोंद केली. तसेच त्याने तीन वेळा गारिनची सर्व्हिसही मोडली. त्यामुळे त्याने सहज हा सामना जिंकला.

त्याचप्रमाणे नवव्या मानांकित ब्रिटनच्या कॅमरून नॉरीने बेल्जियमच्या डेव्हिड गॉफिनवर ३-६, ७-५, २-६, ६-३, ७-५ असा संघर्षपूर्ण विजय मिळवला. उपांत्य फेरीत नॉरीला अग्रमानांकित आणि गतविजेत्या नोव्हाक जोकोव्हिचचा सामना करावा लागणार आहे.

महिला एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत २०१९च्या विम्बल्डन विजेत्या हालेपने २०व्या मानांकित अमेरिकेच्या अमांडा अनिसिमोव्हाला ६-२, ६-४ असा शह दिला. तसेच १७व्या मानांकित कझाकस्तानच्या रायबाकिनाने ऑस्ट्रेलियाच्या आयला टोमयानोव्हिचवर पिछाडीवरून ४-६, ६-२, ६-३ अशी सरशी साधली. उपांत्य फेरीत हालेप आणि रायबाकिना आमनेसामने येतील. टयुनिशियाच्या ओन्स जाबेऊरने विम्बल्डन स्पर्धेत ऐतिहासिक आगेकूच करताना ग्रँडस्लॅम स्पर्धेची उपांत्य फेरी गाठणारी पहिली अरब महिला ठरण्याचा मान मिळवला. महिला एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत तिसऱ्या मानांकित जाबेऊरने बिगरमानांकित चेक प्रजासत्ताकच्या मारी बुझकोव्हावर ३-३, ६-१, ६-१ अशी मात केली.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
708 309 8763

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही